# संजीवन इंग्रजी वाचन नवोपक्रम

**शिक्षण विभाग, पंचायत समिती राहाता,**

**तालुका -राहाता जिल्हा- अहमदनगर.**

# माझा नवोपक्रम 2022-23

# संजीवन इंग्रजी वाचन नवोपक्रम.

**-: नवोपक्रम कर्ता :-**

***श्री. संजीवन रंगनाथ दिवे.***

***शिक्षण विस्तार अधिकारी. बीट - शिर्डी.***

***अतिरिक्त कार्यभार :- बीट - लोणी, बीट - पुणतांबा.***

# स्पर्धकाची माहिती

1. स्पर्धकाचे पूर्ण नाव - श्री. संजीवन रंगनाथ दिवे. ( शिक्षण विस्तार अधिकारी )

2. भ्रमणध्वनी - 9403696322.

3. E-mail Id- sanjivandive@gmail.com

कायमचा पत्ता - मु.पो. दाढ बु || तालुका- राहता. जिल्हा- अहमदनगर.

4- जन्मतारीख -1.6.1969.

6. शैक्षणिक आहता -M. A. B. Ed. SET. NET./JRF.

7.एकूण सेवा-15 वर्षे 5 महिने ( शिक्षण विस्तार अधिकारी या पदावर )

8. नवोपक्रमाचा विषय :- संजीवन इंग्रजी वाचन नवोपक्रम



# प्रतिज्ञा व प्रमाणपत्र

## प्रतिज्ञापत्र

मी श्री/श्रीम/डॉ. संजीवन रंगनाथ दिवे प्रतिज्ञापत्र लिहून देतो/देते की, या नवोपक्रम स्पर्धेसाठी सादर केलेला संजीवन इंग्रजी वाचन नवोक्रम हा नवोपक्रम माझ्या स्वतःच्या शैक्षणिक उपक्रमांवर, अनुभवावर आधारित आहे. हा नवोपक्रम मला स्वतःला सुचलेला आहे, काल्पनिक नाही. तसेच भारतीय अथवा विदेशी लेखकांच्या ग्रंथातील अथवा संशोधनातील माहितीच्या आधारे हा नवोपक्रम लिहिलेला नसून यामध्ये मला जाणवलेल्या समस्येचा सूक्ष्म अभ्यास करण्याचा मी प्रयत्न केलेला आहे. हा नवोपक्रम यापूर्वीच्या राज्यस्तरीय नवोपक्रम स्पर्धेसाठी सादर केलेला नाही. तसेच इतर कोणत्याही व्यक्तीकडून लिहून घेऊन तो मी माझ्या नावावर सादर केलेला नाही. तसे आढळून आल्यास तो Copyright Act १९५७ खाली दाखलपात्र गुन्हा आहे याची मला कल्पना आहे.

दिनांक : 18.11.2022
स्थळ : राहाता

BLOCK EDUCATION OFFICER, TAL. RAHATA, DIST. AHMEDNAGAR, 411017, PANCHAYAT SAMITI RAHATA

स्पर्धकाची स्वाक्षरी
नाव : श्री. संजीवन रंगनाथ दिवे
शाळेचा /कार्यालयाचा शिक्का.

## प्रमाणपत्र

प्रमाणित करण्यात येते की, श्री/श्रीम/डॉ. संजीवन रंगनाथ दिवे हे माझ्या शाळेत / कार्यालयात कार्यरत असून त्यांनी सादर केलेला संजीवन इंग्रजी वाचन नवोक्रम हा नवोपक्रम शैक्षणिक वर्ष 2022-23 मध्ये त्यांनी स्वतः राबविलेला असून ती त्यांच्या स्व परिश्रमाची फलश्रुती आहे. हा नवोपक्रम त्यांनी राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, महाराष्ट्र, पुणे मार्फत आयोजित यापूर्वीच्या राज्यस्तरीय नवोपक्रम स्पर्धेसाठी सादर केलेला नाही.

दिनांक : 18.11.2022
स्थळ : राहाता

BLOCK EDUCATION OFFICER, TAL. RAHATA, DIST. AHMEDNAGAR, 411017, PANCHAYAT SAMITI RAHATA

शाळा/ कार्यालय प्रमुखाची स्वाक्षरी
नाव : गट शिक्षणाधिकारी, पंचायत समिती, राहाता
शिक्का:

# अनुक्रमणिका


| अ.क्र. | नवोपक्रमाच्या पायऱ्या | पान नं. |
|---|---|---|
| 1 | प्रस्तावना | 5 ते 6 |
| 2. | नवोपक्रमाची माझी गरज | 7 ते 8 |
| 3. | नवोपक्रमाची उद्दिष्टे | 9 |
| 4. | माझ्या उपक्रमाची नाविन्यता | 10 ते 13 |
| 5. | माझ्या नवोपक्रमाचे नियोजन | 14 ते 19 |
| 6. | माझ्या उपक्रमाची कार्यवाही | 20 ते 25 |
| 7. | माझ्या उपक्रमाची यशस्विता | 26 ते 31 |
| 8. | समारोप | 32 ते 34 |
| 9. | संदर्भ ग्रंथ | 35 |

# 1.प्रस्तावना

शिक्षण विभाग, पंचायत समिती राहाता. बीट -शिर्डी, अतिरिक्त कार्यभार बीट - लोणी, बीट - पुणतांबा येथे मी जून 2021 पासून कार्यरत आहे. नव्याने हजर झाल्यापासून बीटचे कार्यक्षेत्र व शाळांचा शैक्षणिक दर्जा समजण्यासाठी संपूर्ण बीट मधील व अतिरिक्त बीट मधील संपूर्ण शाळा भेटी करण्यास सुरुवात केली. राहाता तालुक्यातील बीट मधील शाळांतील वर्गांची गुणवत्ता तपासणी करताना माझ्या असे निदर्शनास आले की,विद्यार्थ्यांना इंग्रजी स्पेलिंग वाचता येते. काही विद्यार्थ्यांना शब्द सुद्धा वाचता येतात.परंतु वर्ग तपासणी करताना इंग्रजी पुस्तक वाचण्यास सांगितले की, इंग्रजी वाचताना त्यांच्यामध्ये आत्मविश्वास दिसून येत नाही,असे माझ्या निदर्शनास आले. विद्यार्थ्यांकडून इंग्रजी पाठ्यपुस्तक वाचनाचा पाहिजे तितका सराव होताना दिसून येत नाही.

पालक सुद्धा आपल्या पाल्याच्या इंग्रजी वाचनाबाबत गंभीर होताना दिसत नाहीत.त्यामुळे इंग्रजी विषयाची म्हणावी तितकी आवड विद्यार्थ्यांमध्ये दिसून येत नाही.अशी माझी धारणा झाली. विद्यार्थ्यांमध्ये इंग्रजी विषयाची एक प्रकारची भीती दिसून आली. आत्मविश्वासपूर्वक व आनंददायी पद्धतीने शिक्षकांनी विद्यार्थ्यांना इंग्रजी वाचन शिकवावे व विद्यार्थ्यांनी आत्मविश्वासपूर्वक इंग्रजी पुस्तकाचे वाचन करावे. यासाठी मी चिंतन केले. त्या चिंतनामधून हा नवोपक्रम सुचला.या नवोपक्रमामुळे विद्यार्थ्यांमध्ये इंग्रजी विषयाची प्रगती होऊन गुणवत्ता वाढताना दिसून आली. इंग्रजी विषय अवघड नसतो, तो खूप सोपा असतो. हे पटवून देण्यासाठी इंग्रजी पाठ्यपुस्तकातील पाठ्यांशाचे आनंददायी वाचन विद्यार्थ्यांनी करावे,या उद्देशाने मी " संजीवन इंग्रजी वाचन नवोपक्रम " सुरू करण्याचा निश्चय केला. या नवोपक्रमातून शिक्षकांची व विद्यार्थ्यांची इंग्रजी विषयाशी घट्ट मैत्री होईल असा पूर्ण विश्वास या नवोपक्रमातून साध्य होईल.

उत्कृष्ट वाचन करणाऱ्या विद्यार्थ्यांचे व्हिडीओ काढून ते शिक्षकांनी आपल्या मोबाईलवर स्टेटसला ठेवल्यामुळे जिल्हा परिषद शाळांमध्ये इंग्रजी विषय उत्तमरित्या शिकविला जातो.ही नागरिकांची धारणा होईल व त्यामुळे संपूर्ण शिक्षण विभागाची प्रतिष्ठा वाढेल,असा पूर्ण विश्वास या नवोपक्रम कर्त्यास आहे.

# 2 - नवोपक्रमाची माझी गरज

जिल्हा परिषद प्राथमिक शाळांमध्ये बहुतेक पालक शेतकरी, साधारण आर्थिक परिस्थिती असणाऱ्या , या विद्यार्थ्यांची संख्या जास्त आहे. बऱ्याच वेळा तर त्यांच्या पालकांना वाटते की,आपल्याही पाल्याला इंग्रजी उत्तम प्रकारे यावे. त्याला दर्जेदार शिक्षण मिळावे. या पालकांच्या अपेक्षा पूर्णत्वास नेण्यासाठी या नवोपक्रमातून छोटासा प्रयत्न आहे. शाळा भेटी करताना, औपचारिक तपासणी करण्याऐवजी आपणही हातात पुस्तक घेऊन प्रत्येक शाळेवर गेल्यानंतर शिकवले तर? विद्यार्थ्यांना ते आवडेल का? त्यांना ते समजेल का ? हा सर्व विचार करून, इंग्रजी वाचन विद्यार्थ्यांना व शिक्षकांना मार्गदर्शन होईल असे प्रात्यक्षिक करून दाखवायचे. असे मनोमन ठरविले.

माध्यम वृत्तसेवा

Home › शैक्षणिक › *|| संजीवन इंग्रजी वाचन प्रकल्प ||*

महत्त्वाच्या घडामोडी | महाराष्ट्र | लेख | शैक्षणिक

## *|| संजीवन इंग्रजी वाचन प्रकल्प ||*

By **Gopal Kulkarni** November 16, 2022 57 0



**एखाद्या अधिकाऱ्याने ,
कल्पकतेने चाकोरी बाहेर जाऊन काम केले तर किती सुंदर बदल घडू शकतात,हे आपल्याला संजीवन इंग्रजी वाचन प्रकल्पाविषयी वाचन दिसून येते.**

काही पालकांशी चर्चा केली. काही पालकांचा तर असा गैरसमज आहे. मराठी शाळांमध्ये इंग्रजी शिकवतच नाहीत. या नवोपक्रमामुळे तोही गैरसमज दूर झाला. विद्यार्थ्यांना इंग्रजी वाचण्याची इतकी आवड निर्माण झाली की, अगदी सुट्टीच्या दिवशीही घरी इंग्रजी वाचनाचा सराव घेणेबाबत पालकांना हट्ट करतात. त्या इंग्रजी वाचनाचे व्हिडिओ तयार करून शिक्षकांना पाठवतात. हा नवोपक्रम आपण सुरू केला तर विद्यार्थ्यांच्या मनामध्ये आपले एक स्थान निर्माण करता येईल. प्रत्यक्ष अधिकारी विद्यार्थ्यांना शिकवतात,हा अनुभव त्यांचा टर्निंग पॉईंट होईल, हे निश्चित वाटते. स्वतः अधिकारी इंग्रजी वाचन शिकवतात. त्यातून वर्गावर शिकवणाऱ्या शिक्षकांना विशिष्ट ऊर्जा मिळते. शिक्षक सुद्धा झपाटून या कामाला लागताना दिसून आले. पर्यायाने विद्यार्थी- शिक्षक- पालक - अधिकारी सर्वजण या नवोपक्रमात सहभागी झाले. शिक्षकांनी ठेवलेले स्टेटस अनेक ग्रामस्थ, नागरिक पाहू लागले. त्यामुळे जिल्हा परिषद शाळांकडे पाहण्याचा दृष्टिकोन सकारात्मक निर्माण झाला. विद्यार्थी व शिक्षकांना या उपक्रमातून प्रतिष्ठा प्राप्त होईल . शिक्षकांना आपले चांगले शैक्षणिक कामकाज दाखवण्याची एक संधी या नवोपक्रमातून निश्चित मिळते. असे नवोपक्रम कर्त्याचे ठाम मत आहे.

# 3. नवोपक्रमाची उद्दिष्टे.

1. विद्यार्थ्यांचे इंग्रजी भाषेच्या श्रवण, भाषण, वाचन इत्यादी कौशल्याचा विकास करणे.

2. विद्यार्थ्यांना आनंददायी अध्ययन अध्यापन पद्धतीने इंग्रजी वाचन शिकविणे.

3.विद्यार्थ्यांना इंग्रजी वाचण्याची आवड निर्माण होऊन विद्यार्थ्यांनी आत्मविश्वासपूर्वक इंग्रजी वाचन करणे.

4. शिक्षकांनी विद्यार्थ्यांचे उत्कृष्ट इंग्रजी वाचण्याचे व्हिडिओ काढून आपल्या मोबाईल स्टेटसला ठेवणे.

5. इंग्रजी वाचनात सर्व विद्यार्थी प्रगत करून संपूर्ण शिक्षण विभागाची प्रतिष्ठा वाढविणे.

# 4.माझ्या नवोपक्रमाची नाविन्यता

1. 'संजीवन इंग्रजी वाचन' हा नवोपक्रम राहाता तालुक्यात प्रथमच राबविण्यात आला.

2. या नवोपक्रमात शिक्षण विस्तार अधिकारी हे शिक्षक व विद्यार्थी यांना आनंददायी, आत्मविश्वासपूर्वक इंग्रजी वाचन कसे शिकवावे ? याचे प्रात्यक्षिक करून दाखवतात.

3.या नवोपक्रमात विद्यार्थी इंग्रजी वाचन करतानाचे व्हिडिओ शिक्षक काढतात व आपल्या मोबाईल स्टेटसला ठेवतात.

4. शिक्षकांना बी.एल.ओ. चे कामकाज असल्याने गावातील ग्रामस्थांचे मोबाईल नंबर शिक्षकांकडे व शिक्षकांचे मोबाईल नंबर ग्रामस्थांकडे आहेत.

5. विद्यार्थ्यांचे शिक्षकांनी इंग्रजी वाचनाचे स्टेटस मोबाईलवर ठेवल्यामुळे गावातील पालक व ग्रामस्थ स्टेटस पाहू शकतात.

6. या नवोपक्रमामुळे विद्यार्थ्यांचे व शिक्षकांचे मोठ्या प्रमाणात कौतुक होऊन त्यांना इंग्रजी वाचनासाठी प्रेरणा मिळते.

7. इयत्ता पहिलीपासून इंग्रजी विषयाची सुरुवात केली परंतु इंग्रजी विषयाची फारशी आवड विद्यार्थ्यांमध्ये दिसून येत नाही. विद्यार्थ्यांमध्ये आवड निर्माण करण्यासाठी हा नवोपक्रम अतिशय उपयुक्त आहे.

8. या नवोपक्रमामध्ये विद्यार्थी अत्सखलितपणे इंग्रजी वाचन करू लागल्याचे दिसून येते.


9. दिवाळीच्या सुट्ट्या लागलेल्या असतानाही अनेक विद्यार्थी व अनेक पालक इंग्रजी वाचण्याचा व्हिडिओ तयार करून शिक्षकांना पाठवताना दिसून आले. तसेच पालकांच्या शैक्षणिक ग्रुपवर तो व्हिडिओ शेअर केलेला दिसून आला.

10. कोविड 19 मध्ये पालकांचे व शिक्षकांचे व्हाट्सअप ग्रुप तयार केलेले होते.ते मधल्या काळात बंद पडले होते. या नवोपक्रमामुळे पालकांकडून सदर whats app ग्रुप पुन्हा सुरू झाल्याचे दिसून येते.

11. या नवोपक्रमाच्या आलेल्या बातम्या बऱ्याच शिक्षकांनी त्यांच्या स्टेटसला ठेवल्याने त्या पालकांपर्यंत पोहोचल्या. त्या वाचून पालकही विद्यार्थ्यांचा घरी अभ्यास घ्यायला लागले.

12. एक कल्पक अधिकारी तालुक्याला लाभल्याचे, या उपक्रमातून सिद्ध झाल्याने शिक्षकांनाही कामकाज करण्यास उभारी आलेली आहे.

13. या नवोपक्रमा बाबत मार्गदर्शन केल्यामुळे शिक्षकांना एक प्रकारची स्फूर्ती मिळालेली आहे.



14. हा उपक्रम खरोखरच सर्वांच्या मनाला भावल्यामुळे कमी कालावधीत फार मोठ्या प्रमाणात याचा प्रचार व प्रसिद्धी झाल्याने शैक्षणिक चळवळ निर्माण झाली.

15. या नवोपक्रमामुळे विद्यार्थ्यांमध्ये व शिक्षकांमध्ये एक प्रकारची स्पर्धा तयार झाली. कोणत्या वर्गातील जास्तीत जास्त मुले उत्तम प्रकारे इंग्रजी वाचन करू लागतील. यासाठी जोमाने विशेष प्रयत्न करण्यास सुरुवात झाली.

16. खेड्यापाड्यातील,ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना स्पर्धेमध्ये अग्रेसर बनवणारा हा नवोपक्रम आहे.

17. इंग्रजी विषयाची विद्यार्थ्यांची पायाभरणी सुंदर व मजबूत होते.

18. शिक्षण खातं सांभाळणारा अधिकारी विद्यार्थ्यांच्या शिक्षणाकडे इतके बारीक लक्ष देतो. ही अभिमानास्पद बाब आहे. व्यवस्थापन सांभाळून शैक्षणिक कामकाज करणे म्हणजे खूप वैशिष्ट्यपूर्ण कामकाज दिसून येते. या वैशिष्ट्यपूर्ण कामकाजामुळे हा नवोपक्रम शिक्षकांच्या मनाला जास्त भावलेला दिसतो.

19. जिल्हा परिषद शाळेने हा नवोपक्रम स्वीकारला, त्यांचे कामकाज गावांमध्ये दिसू लागले. हे पाहून काही खाजगी शाळांनी या उपक्रमाला सुरुवात केलेली आहे.

20. हा उपक्रम सुरुवातीला कमी प्रमाणात सुरू होता. नंतर दिवसेंदिवस त्यात वाढ होत गेली. शिक्षक ,विद्यार्थी व पालक यांनी भरभरून प्रतिसाद दिलेला आहे.

21. इंग्रजी विषयाची एवढी आवड निर्माण झाली आहे की , इंग्रजी सोडून दुसरे काहीच करू नये. असे प्रत्येक शिक्षक व विद्यार्थ्यांना वाटू लागले.

22. शिक्षकांच्या मोबाईल स्टेटसवर या छोट्याशा मुलांचे इंग्रजी वाचनाचे स्टेटस पाहून शिक्षकांना मित्रमंडळी, नातेवाईक व अनेक घटकातून अभिनंदनाचे मेसेज येऊ लागले.

23. इंग्रजी विषय सर्वांना सोपा वाटू लागला.

24. या नवोपक्रमातून शिक्षक व पालक यांच्यामध्ये सुसंवाद घडू लागला.

25. आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर केल्याने विशेष करून मोबाईल स्टेटसचा वापर केल्याने या प्रकल्पाचा प्रसार आणि प्रचार फार लांब पर्यंत गेला.

26. या नवोपक्रमामुळे विद्यार्थ्यांना आनंद मिळू लागला व पालकांमध्ये देखील उत्साह दिसून आला.

27. हा उपक्रम पाहून, इतर शिक्षक देखील आमच्याही शाळेमध्ये आम्ही उत्स्फूर्तपणे हा उपक्रम राबवणार आहोत, अशा प्रतिक्रिया देऊ लागले.

28. या आदर्शवत संकल्पनेतून नाविन्यपूर्ण उपक्रम निर्माण झाला . या नवोपक्रमामुळे विद्यार्थ्यांना एक नवसंजीवनी मंत्रच लाभला.

29. हा नवोपक्रम यशस्वी झाल्याचे पाहून जिल्हा परिषद शाळांमध्ये आमच्या पाल्यांचा प्रवेश घ्यावा ,असे पालकांना वाटू लागले.

30. हा नवोपक्रम आगळावेगळा असून निरंतर चालणारा आहे. तसेच जरा ' हटके उपक्रम ' आहे.

31. जिल्हा परिषद शाळेचे विद्यार्थी शिक्षणात नक्कीच पुढे जाऊन, अभ्यासात चमकणार आहेत असा हा उपक्रम आहे.

32. जिल्हा परिषद शाळेतील विद्यार्थी इंग्रजीचा बाऊ न करता इंग्रजी विषयाबरोबर त्यांची घट्ट मैत्री होते.

33. कोणतीही भाषा शिकण्यासाठी प्रथम त्या भाषेचे श्रवण करणे आवश्यक आहे. त्यानुसार विद्यार्थ्यांचे श्रवण कौशल्य विकसित होणे अपेक्षित आहे. जो भाग शिकवायचा आहे, त्याचे उत्तम प्रकारे विद्यार्थ्यांना श्रवण करण्याची संधी दिली जाते. विद्यार्थ्यांनी अवधानपूर्वक श्रवण केले की, त्यांच्या बुद्धीमध्ये त्या शब्दाची एक प्रतिमा तयार होते. ते समजून घेऊन वाचन करू लागतात. इंग्रजी भाषा वाचण्यासाठी विद्यार्थ्यांना प्रेरित केले जाते. विद्यार्थी स्वयंस्फूर्तपणे या उपक्रमात सहभाग होतील अशी त्यांची मनोधारणा केली जाते.


34. श्रवण, भाषण, वाचन या कौशल्यावर आधारित हा नवोपक्रम असल्याने निश्चितच या उपक्रमामध्ये नाविन्यता आहे. अशी सादरकर्त्याची धारणा आहे.

# 5.माझ्या नवपक्रमाचे नियोजन

' Well begun is half done ' चांगली सुरुवात म्हणजे अर्धे काम पूर्ण होते. त्यामुळेच उत्कृष्ट नियोजन करणे हे महत्त्वाचे आहे .

1. <u>विद्यार्थी संख्या</u>- शैक्षणिक वर्ष 2022-23 जिल्हा परिषद प्राथमिक शाळा निमसेवाडी, खडकेवाके. तालुका- राहता. इयत्ता चौथीच्या वर्गाचा पट -16 . या नवोक्रमासाठी प्रायोगिक तत्त्वावर इयत्ता चौथीच्या विद्यार्थ्यांची निवड करण्यात आलेली आहे.

2. <u>अभ्यासक्रम मर्यादा</u>- हा नवोपक्रमचा इयत्ता चौथीच्या विद्यार्थ्यांना आनंददायी व आत्मविश्वासपूर्वक इंग्रजी वाचन करता यावे, हा मुख्य उद्देश ठेवून इंग्रजी पाठ्यपुस्तकातील पान नंबर तीन वरील English Dialogue 1 या पाठ्यांशाची निवड करण्यात आली.





3. <u>नवोपक्रमाची व्याप्ती व मर्यादा</u> - प्रस्तुत उपक्रम अहमदनगर जिल्ह्यातील राहाता तालुक्यातील जिल्हा परिषद प्राथमिक शाळा निमशेवाडी, खडकेवाके येथील इयत्ता चौथीच्या वर्गासाठी सन 2022-23 मध्ये यशस्वी करून तालुक्यातील 149 शाळांमध्ये

अंमलबजावणी करणे विषयी कामकाज केले. राहाता तालुक्यातील 149 जिल्हा परिषद शाळांमध्ये 451 शिक्षक यांनी उस्फूर्तपणे सहभाग घेण्याचे ठरविलेले आहे. 11/10/2022 रोजी 153 शिक्षकांनी यात उस्फुर्त सहभाग नोंदविल्याने ' क्षितिज समाचार ' या वृत्तपत्रात संबंधितांची नावे दि.11/10/2022 रोजी जाहीर करण्यात आली होती. दि. 18/11/2022 अखेर जवळपास 423 शिक्षकांनी यात सहभाग नोंदविला.

4. <u>नवोपक्रमाचा कालावधी</u> - हा नवोपक्रम सन 2022-23 या शैक्षणिक वर्षासाठी राबविण्यात आला असून 1 जुलै 2022 ते 15 नोव्हेंबर या कालावधीत अहमदनगर जिल्ह्यातील राहाता तालुक्यातील जिल्हा परिषद प्राथमिक शाळा निमसेवाडी, खडकेवाके येथील इयत्ता चौथीच्या वर्गासाठी 2022-23 यशस्वी करून तालुक्यातील सर्व शाळांमध्ये राबविण्यात आला. या नवोपक्रमामुळे शिक्षक प्रेरित झाले. या नवोपक्रमाचे त्यांना जे फायदे झाले. त्याच्या प्रतिक्रिया नावानिशी ' क्षितिज समाचार ' या वृत्तपत्रात प्रकाशित झालेल्या आहेत.

5. <u>नवोपक्रमासाठी लागणारे साहित्य</u> :-' संजीवन इंग्रजी वाचन ' हा नवोपक्रम बीट मध्ये व अतिरिक्त कार्यभार असणाऱ्या बीटमध्ये म्हणजे संपूर्ण तालुक्यात घेण्याचे ठरले. इयत्ता चौथीच्या इंग्रजी पाठ्यपुस्तकातील पान नंबर तीन वरील इग्लिश संवाद हा सोप्यात सोपा इग्लिश संवाद निवडून आनंददायी व कृतीयुक्त इंग्रजी वाचन शिकवण्याबाबत तयारी केली. ' Best planning is the first step of success ' याप्रमाणे विद्यार्थ्यांचे इंग्रजी विषयाचे श्रवण, भाषण, वाचन या कौशल्यांचा विकास करून विद्यार्थी आनंददायी व आत्मविश्वासाने इंग्रजी वाचन करतात. अशी माझी धारणा झाली.

1. पालक- शिक्षक व्हाट्स अप ग्रुप




2. शिक्षकांचे मोबाईल स्टेटस

3. शाळा व्यवस्थापन समिती अध्यक्ष व शिक्षण प्रेमी यांचा तालुकास्तरावर व्हाट्स अप ग्रुप.

4. उत्कृष्ट नवोपक्रमाला उत्कृष्ट प्रसिद्धी देण्यासाठी वृत्तपत्रांतील बातम्या

5. एस नाईन न्यूज चैनल ची 13 मिनिटांची बातमी. ' संजीवन इंग्रजी वाचन ' हा नवोपक्रम यशस्वी करण्यासाठी राबवावयाच्या विविध कौशल्याचे नियोजन करण्यात आले.

<u>अ ) उपक्रम स्थितीचे निरीक्षण</u> -1. विद्यार्थी इंग्रजी वाचन करण्यास सकारात्मकता दाखवत नाहीत.

2. शिक्षण विस्तार अधिकारी विद्यार्थ्यांच्या वाचनाचे तपासणी करीत असताना शिक्षक विद्यार्थ्यांना वाचण्यासाठी प्रोत्साहित करताना दिसून येतात.

3. यामुळे विद्यार्थ्यांचा आत्मविश्वास आणखीन कमी होताना दिसतो.

4. विद्यार्थी घाबरून जातात.

5. विद्यार्थ्यांचे लक्ष विचलित झाल्यामुळे वाचनात अडथळे निर्माण होतात.

ब ) करावयाच्या कृतीचा क्रम

1.शिक्षण विस्तार अधिकारी हे शिक्षक व विद्यार्थ्यांना आनंददायी इंग्रजी वाचन करण्याविषयी प्रात्यक्षिक दाखवतात.

| पायऱ्या | कार्य विवरण | जबाबदारी |
|---|---|---|
| प्रथम पायरी-1 | शिक्षण विस्तार अधिकारी यांनी इ.4 थी च्या विद्यार्थ्यांना व शाळेतील सर्व शिक्षकांना इंग्रजी वाचना बाबत मार्गदर्शन व प्रात्यक्षिक करुन दाखविणे. | शिक्षण विस्तार शिक्षण विस्तार |
| पायरी- 2 | शिक्षकांनी व विद्यार्थ्यांनी इंग्रजी वाचन प्रात्यक्षिक बारकाईने निरीक्षण करून आत्मसात करणे. | शिक्षक व विद्यार्थी |
| पायरी -3 | शिक्षण विस्तार अधिकारी जेव्हा इंग्रजी वाचनाचे मार्गदर्शन करतात तेव्हा विद्यार्थ्यांनी व्यवस्थित श्रवण करावे. जेणेकरून त्यांचे इंग्रजी विषयाचे श्रवण कौशल्य विकसित होईल. | विद्यार्थी |
| पायरी 4 | शिक्षण विस्तार अधिकारी हे प्रत्यक्ष मोठ्याने इंग्रजी वाक्य वाचतील, तेच इंग्रजी वाक्य विद्यार्थ्यांनी श्रवण करून स्पष्ट उच्चार करावे. | विद्यार्थी |
| पायरी -5 | वर्गातील सर्व विद्यार्थ्यांनी सामुदायिक प्रकट वाचन करावे. त्याबाबत सुसूत्रता यावी म्हणून शिक्षण विस्तार अधिकारी यांनी मार्गदर्शन करावे. | विद्यार्थी |
| पायरी -6 | विद्यार्थ्यांनी वैयक्तिक इंग्रजी वाचन करण्याचा प्रयत्न करणे. त्यांना मधून- मधून शिक्षण विस्तार अधिकारी यांनी सपोर्ट करणे. | शिक्षण विस्तार अधिकारी |
| पायरी - 7 | वर्गातील किती टक्के विद्यार्थी उत्तम इंग्रजी वाचन करतात व किती टक्के विद्यार्थ्यांना इंग्रजी वाचन करताना सपोर्ट द्यावा लागतो. याची निरीक्षणे नोंदविणे. | विद्यार्थी , शिक्षण विस्तार अधिकारी |
| पायरी -8 | विद्यार्थ्यांना इंग्रजी वाचनाच्या सरावासाठी वेळ देणे. | शिक्षण विस्तार शिक्षण विस्तार |
| पायरी -9 | शिक्षण विस्तार अधिकारी यांनी इंग्रजी वाचन नवोपक्रमाचे ज्या पद्धतीने प्रात्यक्षिक दाखवले, त्या | विद्यार्थी -शिक्षक |

| | | |
|---|---|---|
| | पद्धतीने विद्यार्थ्यांना शाळेतील शिक्षकांनी इंग्रजी वाचन शिकविणे. विद्यार्थ्यांचे इंग्रजी विषयाचे श्रवण कौशल्य विकसित करणे . | |
| पायरी -10 | जे विद्यार्थी इंग्रजी वाचन करतात, त्यांच्या इंग्रजी वाचनाचा  व्हिडिओ काढणे. तो व्हिडिओ शिक्षकांनी आपल्या स्वतःच्या मोबाईल स्टेटसला ठेवणे. | विद्यार्थी -शिक्षक |
| पायरी -11 | याबाबत विद्यार्थ्यांना कल्पना द्यावी.विद्यार्थी आपल्या पालकांना कल्पना देतील. जिल्हा परिषद शाळेतील शिक्षक बी.एल.ओ. चे कामकाज करतात. त्यामुळे सर्व शिक्षकांकडे गावातील ग्रामस्थांचे मोबाईल नंबर सेव्ह करणे. गावातील ग्रामस्थांकडे शिक्षकांचे मोबाईल नंबर  सेव्ह करण्यासाठी प्रयत्न करणे. | विद्यार्थी -शिक्षक-पालक-ग्रामस्थ |
| पायरी -12 | आपण चांगले इंग्रजी वाचन केल्यास आपल्या इंग्रजी वाचनाचा व्हिडिओ शिक्षक काढतात व तो त्यांच्या मोबाईल स्टेटसला ठेवतात. त्यामुळे विद्यार्थ्यांना इंग्रजी वाचन करण्याविषयी प्रेरणा मिळेल. विद्यार्थ्यांमध्ये एक प्रकारची स्पर्धा तयार होईल. माझे इंग्रजी वाचनाचे स्टेटस ठेवा असे विद्यार्थी शिक्षकांना आग्रह धरतील. | विद्यार्थी |
| पायरी -13 | जिल्हा परिषद शाळेचे विद्यार्थी इतक्या उत्कृष्ट प्रकारे इंग्रजीचे वाचन करतात, हे सर्व ग्रामस्थांपर्यंत पोहोचेल. गावात शैक्षणिक चर्चा होण्यास सुरुवात होईल. | पालक-ग्रामस्थ-पदाधिकारी -अधिकारी |
| पायरी 14 | जे विद्यार्थी इंग्रजी वाचनात मागे असतील ते विद्यार्थी,"आमचा अभ्यास घ्या." असे पालकांना म्हणतील. पालकही आपल्या पाल्याचा आनंदाने अभ्यास घेतील.आपल्या  पाल्याच्या घरी इंग्रजी वाचन शिकवण्यासाठी पालकांना प्रेरणा मिळेल. | विद्यार्थी -पालक |
| पायरी-15 | जे विद्यार्थी इंग्रजी वाचनात मागे पडतील. त्यांचे इंग्रजी वाचन स्टेटसला दिसणार नाही. त्यांचे पालक शिक्षकांना भेटून "माझ्याही पाल्याकडे चांगले लक्ष द्या. त्यालाही इंग्रजी वाचन शिकवा." असे म्हणतील त्यामुळे विद्यार्थी शिक्षक पालक यांचा स्नेहबंध तयार होईल . | विद्यार्थी -पालक |
| पायरी -16 | आपल्या जिल्हा परिषद शाळेत इंग्रजी चांगले शिकविले | विद्यार्थी -पालक |

| | | |
|---|---|---|
| | जाते. इतके छोटे विद्यार्थी उत्तम इंग्रजी वाचतात.हे स्टेटसला पाहून संबंधित शिक्षकांवर कौतुकाचा वर्षाव होईल. | |
| पायरी -17 | शिक्षकांकडून पालक प्रेरणा घेऊन आपल्या पाल्याचा इंग्रजी वाचनाचा व्हिडिओ स्टेटसला ठेवतील. | विद्यार्थी -पालक |
| पायरी -18 | गावातील जिल्हा परिषद शाळांमध्ये इतके चांगले इंग्रजी वाचनाबाबत कामकाज सुरू आहे हे सर्व ग्रामस्थांना समजेल.ते इंग्रजी वाचन नवोपक्रमात सहभागी होतील. | विद्यार्थी ,पालक, शिक्षक,ग्रामस्थ, नातेवाईक,मित्रमंडळी , अधिकारी,पदाधिकारी |

क- उपक्रमोत्तर स्थितीचे निरीक्षण :-

1. शिक्षण विस्तार अधिकारी यांनी इंग्रजी वाचनाचे प्रात्यक्षिक करून दाखविल्यानंतर विद्यार्थी आत्मविश्वासाने सामुदायिक वाचन करतात.

2. शिक्षक व विद्यार्थी यांच्या चेहऱ्यावर पूर्ण आत्मविश्वास व आश्चर्य दिसून येते

3. वर्गातील हुशार विद्यार्थी प्रथम आत्मविश्वासाने इंग्रजी वाचन करून दाखवतात

4. टप्प्या टप्प्याने इतरही विद्यार्थी आत्मविश्वासाने इंग्रजी वाचन करून दाखवतात.

5. इंग्रजी विषयातील सोपा व छोटा घटक निवडून, विद्यार्थ्यांमध्ये बसून त्यांना इंग्रजी वाचन कसे शिकवावे? याचे आनंददायी अध्यापन पद्धतीने श्रवण, भाषण, वाचन कौशल्याचा वापर करून शिकवितात.शिक्षण विस्तार अधिकारी यांनी वापरलेला प्रयोग शिक्षक आत्मसात करतात.शिक्षक या प्रयोगाचे अनुकरण करून विद्यार्थ्यांना आनंददायी व आत्मविश्वासपूर्वक वाचन शिकवितात. विद्यार्थ्यांच्या इंग्रजी वाचनाच्या या प्रयोगातून विद्यार्थी व शिक्षकांना प्रेरणा मिळते.

# 6. माझ्या नवोपक्रमाची कार्यवाही

आत्मविश्वासाने शाळा भेटी करता-करता सुचलेला ' संजीवन इंग्रजी वाचन नवोपक्रमाचे' नियोजन पूर्ण झाले. इंग्रजी वाचनासाठी श्रवण, भाषण, वाचन या कौशल्यांचा वापर करून या नवोपक्रमाची कार्यवाही सुरू झाली . शिक्षण विस्तार अधिकारी यांनी शाळा भेटी करताना हातात इंग्रजी पुस्तक घेऊन इंग्रजी वाचन शिकवण्यासाठी एका सोप्या उताऱ्याची निवड करण्यात आली .त्यानंतर शिक्षक व विद्यार्थी यांना एकत्रित बसवून , सर्व विद्यार्थी व शिक्षक हे कमीत कमी अंतरावर असतील अशी वर्गातील बैठक व्यवस्थेची रचना करण्यात येते. शिक्षण विस्तार अधिकारी हे सर्व शिक्षक व विद्यार्थी यांना नावे विचारून ओळख करून घेतात. जेणेकरून सर्व विद्यार्थ्यांची मनाने जवळीक निर्माण होईल. विद्यार्थ्यांशी संवाद करताना, "तुम्हाला मी दहा मिनिटात हा एक इंग्रजी पॅरेग्राफ 100% वाचायला शिकवणार आहे आणि तुम्ही सर्वजण तो वाचणार आहात," असा आत्मविश्वास विद्यार्थ्यांमध्ये जागृत करण्यात येतो. शिक्षण विस्तार अधिकारी इंग्रजी उतारा मोठ्याने शब्द, वाक्य वाचन करतील. त्यावेळी विद्यार्थी त्या शब्दावर बोटे ठेवतात की नाही, शिक्षक त्याचे निरीक्षण करतील. म्हणजे विद्यार्थ्यांचे इंग्रजी विषयाचे श्रवण कौशल्य विकसित करण्यासाठी खास प्रयत्न केला जातो. शिक्षण विस्तार अधिकारी यांनी इंग्रजी पाठ्यांशाचे वाचन केले ,की लगेच विद्यार्थी त्या प्रमाणे स्पष्ट शब्दात इंग्रजी वाचन करतात. म्हणजे विद्यार्थ्यांचे इंग्रजी भाषण कौशल्य विकसित करण्यात येते. शिक्षण विस्तार अधिकारी हे विद्यार्थी व शिक्षक यांचे सामुदायिक इंग्रजीचे प्रकट वाचन घेतात . या पद्धतीने विद्यार्थ्यांना इंग्रजी वाचता येणे बाबतचा आत्मविश्वास विद्यार्थ्यांमध्ये जागृत करण्यात येतो. अभ्यासात पुढे असणाऱ्या विद्यार्थ्यांनी वाचन आत्मसात केले की ते स्वतंत्र वाचून दाखवतात. इतर विद्यार्थी त्यावेळी त्यांच्या इंग्रजी वाचनाचे श्रवण करतात. वाचणारे विद्यार्थी भाषण आणि वाचन कौशल्यांचा विकास करून स्वयं प्रेरणेने प्रयत्न करतात. वर्गातील 80 टक्के विद्यार्थी इंग्रजी पॅरेग्राफ वाचून दाखवतात. उर्वरित 20% विद्यार्थी प्रयत्नाने व सरावाने वाचून दाखवतात. उत्तम इंग्रजी वाचन करणाऱ्या विद्यार्थ्यांचा शिक्षक इंग्रजी वाचनाचा व्हिडिओ काढतात. तो व्हिडीओ आपल्या स्वतःच्या मोबाईल स्टेटसला ठेवतात. आपले इंग्रजी वाचनाचे स्टेटस आपल्या सरांनी स्वतःच्या मोबाईल स्टेटसला ठेवल्याने

विद्यार्थी प्रेरणा घेतात व इंग्रजी वाचनात त्यांना आणखीन गोडी वाढते. आपला पाल्य इतक्या उत्तम प्रकारे इंग्रजी वाचन करतो, हे पाहून पालकांना खूप आनंद होतो व तेही आपल्या पाल्याचे इंग्रजी वाचनाचे स्टेटस स्वतःच्या मोबाईलवर ठेवतात. इंग्रजी वाचन स्टेटस प्रकल्पामुळे संपूर्ण ग्रामस्थांमध्ये इंग्रजी वाचनाची शैक्षणिक चर्चा होताना दिसून येते. त्यातून विद्यार्थी, शिक्षक, पालक यांना मोठ्या प्रमाणात प्रोत्साहन मिळते.तात्पर्य मराठी माध्यमांच्या जिल्हा परिषद शाळातील विद्यार्थी उत्तम प्रकारे इंग्रजी वाचन करू लागतात.




1. साहित्याचा वापर

अ) जे विद्यार्थी उत्कृष्ट वाचन करतात, त्यांच्या इंग्रजी वाचनाचा व्हिडिओ शिक्षक मोबाईल मध्ये काढतात.

ब) विद्यार्थ्यांचा इंग्रजी वाचनाचा काढलेला व्हिडिओ शिक्षक मोबाईल स्टेटसला ठेवतात.

क) इंग्रजी वाचनाचा व्हिडिओ पालक ग्रामस्थ पाहतात व शिक्षकांचे आणि विद्यार्थ्यांचे कौतुक करतात.

ड) इंग्रजी वाचनाचा व्हिडिओ पालकांच्या व शिक्षकांच्या व्हाट्सअप ग्रुपला शेअर करतात.

इ )तालुकास्तरावर सर्व व्यवस्थापन समिती अध्यक्ष व गावातून एक शिक्षण प्रेमी यांचा व्हाट्सअप ग्रुप तयार करण्यात आलेला आहे. त्या ग्रुप वर विद्यार्थी वाचनाचे व्हिडिओ शेअर केल्यामुळे तालुक्यातील सर्व ग्रामस्थांपर्यंत अशा प्रकारे या उपक्रमाचा प्रचार आणि प्रसिद्धी होताना दिसून येते .यातून संपूर्ण तालुक्यातील विद्यार्थी व शिक्षक यांना प्रेरणा मिळते.

ई) हा नवोपक्रम सुरु असताना अनेक वृत्तपत्रांनी याची दखल घेतली. या नवोपक्रमाबाबत अनेक ठिकाणावरून अनेक वेळी बातम्या प्रसिद्ध झालेल्या आहेत. त्या सर्व बातम्यांचा उल्लेख समारोपात करण्यात आलेला आहे.

**नवोपक्रमाची कार्यवाही**

| **पायऱ्या** | कार्य विवरण | **जबाबदारी** |
|---|---|---|
| प्रथम पायरी-1 | शिक्षण विस्तार अधिकारी इ.4 थी च्या विद्यार्थ्यांना व शाळेतील सर्व शिक्षकांना इंग्रजी वाचना बाबत मार्गदर्शन व प्रात्यक्षिक करुन दाखवितात. | शिक्षण विस्तार अधिकारी,विद्यार्थी ,शिक्षक |
| पायरी 2 | शिक्षक व विद्यार्थी इंग्रजी वाचन प्रात्यक्षिकाचे बारकाईने निरीक्षण करून आत्मसात करतात. | शिक्षक व विद्यार्थी |
| पायरी -3 | शिक्षण विस्तार अधिकारी जेव्हा इंग्रजी वाचनाचे मार्गदर्शन करतात, तेव्हा विद्यार्थी व्यवस्थित , बारकाईने श्रवण करतात. | विद्यार्थी |
| पायरी -4 | शिक्षण विस्तार अधिकारी हे प्रत्यक्ष मोठ्याने इंग्रजी वाक्य वाचतात. तेच इंग्रजी वाक्य विद्यार्थी श्रवण करून स्पष्ट उच्चार करतात. | विद्यार्थी |
| पायरी -5 | वर्गातील सर्व विद्यार्थी सामुदायिक प्रकट वाचन करतात. त्याबाबत सुसूत्रता यावी म्हणून शिक्षण विस्तार अधिकारी हे मार्गदर्शन करतात. | विद्यार्थी |
| पायरी -6 | विद्यार्थी वैयक्तिक इंग्रजी वाचन करण्याचा प्रयत्न करतात. त्यांना मधून- मधून शिक्षण विस्तार अधिकारी हे सपोर्ट करतात. | शिक्षण विस्तार अधिकारी, विद्यार्थी |

| | | |
|---|---|---|
| पायरी - 7 | अशा प्रकारे इंग्रजी विषयाच्या निवडलेल्या संवादाचे वर्गातील 50% पेक्षा जास्त विद्यार्थी उत्तम इंग्रजी वाचन करतात. 30 % विद्यार्थ्यांना इंग्रजी वाचन करताना सपोर्ट द्यावा लागतो. 20 % विद्यार्थी इंग्रजी वाचनाचा चांगला प्रयत्न करतात. | विद्यार्थी |
| पायरी -8 | विद्यार्थ्यांना इंग्रजी वाचनाचा सराव करण्यासाठी 10 मिनिटे वेळ दिल्यानंतर 80 % विद्यार्थी उत्तम वाचतात. 20 % विद्यार्थी समाधानकारक प्रयत्न करतात. | शिक्षण विस्तार अधिकारी |
| पायरी -9 | शिक्षण विस्तार अधिकारी यांनी इंग्रजी वाचन प्रकल्पाचे ज्या पद्धतीने प्रात्यक्षिक दाखवले. त्या पद्धतीने विद्यार्थ्यांना शाळेतील शिक्षक इंग्रजी वाचन शिकवितात.तसेच अन्य कौशल्य वापरून इंग्रजी वाचनाचा सराव घेतात. इंग्रजी भाषेचे श्रवण,भाषण व वाचन या पायऱ्यानुसार अध्यापन करून विद्यार्थ्यांकडून सराव करून घेतात. | विद्यार्थी -शिक्षक |
| पायरी -10 | जे विद्यार्थी इंग्रजी वाचन चांगले करतात,त्यांचा व्हिडिओ काढतात. तो व्हिडिओ शिक्षक आपल्या स्वतःच्या मोबाईल स्टेटसला ठेवतात. | विद्यार्थी -शिक्षक |
| पायरी -11 | याबाबत विद्यार्थ्यांना कल्पना देतात. विद्यार्थी आपल्या पालकांना कल्पना देतात, जिल्हा परिषद शाळेतील शिक्षक बी.एल.ओ .चे कामकाज करतात त्यामुळे सर्व शिक्षकांकडे गावातील ग्रामस्थांचे मोबाईल नंबर सेव आहेत व गावातील ग्रामस्थांकडे शिक्षकांचे मोबाईल नंबर सेव आहेत. | विद्यार्थी -शिक्षक-पालक-ग्रामस्थ |
| पायरी -12 | आपण चांगले इंग्रजी वाचन केल्याने आपल्या इंग्रजी वाचनाचा व्हिडिओ शिक्षक काढतात व तो त्यांच्या मोबाईल स्टेटसला ठेवतात. त्यामुळे विद्यार्थ्यांना इंग्रजी वाचन करण्याविषयी प्रेरणा मिळाली.विद्यार्थ्यांमध्ये एक प्रकारची स्पर्धा तयार झाली. माझे इंग्रजी वाचनाचे स्टेटस ठेवा असे विद्यार्थी शिक्षकांना आग्रह धरतात. | विद्यार्थी |
| पायरी -13 | गावातील पालक, ग्रामस्थ आपले जिल्हा परिषद शाळेचे विद्यार्थी इतक्या उत्कृष्ट प्रकारे इंग्रजीचे वाचन | पालक-ग्रामस्थ-पदाधिकारी -अधिकारी |

| | | |
|---|---|---|
| | करतात. हे सर्व ग्रामस्थांपर्यंत पोहोचल्याने गावात शैक्षणिक चर्चा होण्यास सुरुवात झाली. | |
| पायरी 14 | जे विद्यार्थी इंग्रजी वाचनात मागे आहेत, ते विद्यार्थी "आमचा अभ्यास घ्या'" असे पालकांना म्हणतात.पालकही आपल्या पाल्याचा आनंदाने अभ्यास घेतात. आपल्या पाल्यांना घरी इंग्रजी वाचन शिकवण्यासाठी पालकांना प्रेरणा मिळते. | विद्यार्थी -पालक |
| पायरी-15 | जे विद्यार्थी इंग्रजी वाचनात मागे पडतात त्यांचे इंग्रजी वाचन स्टेटसला दिसत नाही त्यांचे पालक शिक्षकांना भेटून, "माझ्याही पाल्याकडे चांगले लक्ष द्या, त्यालाही इंग्रजी वाचन शिकवा," असा आग्रह धरू लागले. त्यामुळे विद्यार्थी, शिक्षक आणि पालक यांचा स्नेहबंध तयार झाला . | विद्यार्थी -पालक |
| पायरी -16 | आपल्या जिल्हा परिषद शाळेत इंग्रजी चांगले शिकविले जाते. इतके छोटे विद्यार्थी उत्तम इंग्रजी वाचतात. हे स्टेटसला पाहून संबंधित शिक्षकांवर कौतुकाचा वर्षाव होत आहे. | विद्यार्थी -पालक |
| पायरी -17 | शिक्षकांकडून पालक ही प्रेरणा घेऊन आपल्या पाल्याचा इंग्रजी वाचनाचा व्हिडिओ स्टेटसला ठेवू लागतात. | विद्यार्थी -पालक |
| पायरी -18 | गावातील जिल्हा परिषद शाळांमध्ये इतके चांगले इंग्रजी वाचनाबाबत कामकाज सुरू आहे. हे सर्व ग्रामस्थांना समजल्याने इंग्रजी वाचन नवोपक्रमात सहभागी होतात. | विद्यार्थी -पालक |

**3.कार्यवाही करताना आलेल्या अडचणी–**

1) विद्यार्थ्यांना इंग्रजी वाचन करायचे, याबाबत त्यांच्यावर एखादे संकट ओढवले आहे. अशी त्यांची स्थिती होताना दिसून येते.

2) इंग्रजी उच्चार करताना विद्यार्थी अडखळतात. त्यांच्या जिभेची योग्य हालचाल होत नाही. ओठांचे हालचाल करताना त्यांना समस्या निर्माण होतात.

3) मला इंग्रजी वाचता येणार की नाही ? या न्यूनगंडात विद्यार्थी दिसून येतात.

4) विद्यार्थ्यांमध्ये सुरुवातीला आत्मविश्वास दिसून येत नाही.

**4. नवोपक्रम पूर्ण झाल्यावर केलेली निरीक्षणे**

1) विद्यार्थी सामुदायिक इंग्रजी वाचन करताना आनंदीत झालेले दिसतात.

2) विद्यार्थी दहा मिनिटांमध्ये इंग्रजी पॅरेग्राफ वाचून दाखवतात.

3) हे सर्व पाहून शिक्षक आश्चर्यचकित होताना दिसून येतात

4) शिक्षण विस्तार अधिकारी यांनी दहा मिनिटांमध्ये इंग्रजीचा एक पॅरेग्राफ विद्यार्थ्यांना वाचून दाखवून शिकविला. विद्यार्थी सुद्धा दहा मिनिटात वाचायला लागले. यातून शिक्षक प्रेरणा घेऊन याच पद्धतीने आम्हीही संपूर्ण वर्गाला इंग्रजी वाचन शिकवणार ,याची ग्वाही देतात. व प्रत्यक्षात 'संजीवन इंग्रजी वाचन नवोपक्रम ' यशस्वी करतात.

5) एका शिक्षकाचा हा नवोपक्रम यशस्वी झाला. अनेक शिक्षक त्यांच्याशी संपर्क करून मार्गदर्शन घेतात. अनेक ठिकाणी 'संजीवन इंग्रजी वाचन नवोपक्रम ' यशस्वी होताना दिसून आला.

# 7. माझ्या नवोपक्रमाची यशस्विता

संजीवन इंग्रजी वाचन हा नवोपक्रम प्रायोगिक तत्त्वावर जिल्हा परिषद प्राथमिक शाळा निमसेवाडी, खडकेवाके तालुका राहाता जिल्हा- अहमदनगर. येथे राबविल्यावर विद्यार्थ्यांमध्ये इंग्रजी वाचनाबाबत खूपच प्रगती दिसू लागली. हा अनुभव जमेस धरून प्रायोगिक तत्त्वावर संपूर्ण तालुक्यात हा नवोपक्रम राबविण्यात आला. या यशानंतर हा उपक्रम पुढे सुरू आहे. या उपक्रमाची यशस्विता खालील प्रमाणे निदर्शनास येते.

1. शिक्षण विस्तार अधिकारी केवळ शाळेची औपचारिक तपासणी न करता शाळेतील विद्यार्थ्यांशी जवळीक निर्माण करून घेतात.

2. अधिकारी स्वतः हातात पुस्तक घेऊन विद्यार्थी व शिक्षक यांना इंग्रजी वाचन करण्याबाबत मार्गदर्शन करून प्रात्यक्षिक दाखवतात. हा प्रशासनाचा मोठा विजय आहे असे मला वाटते.

3. शिक्षण विस्तार अधिकारी यांच्या शाळा भेटी सखोल आणि शैक्षणिक दृष्ट्या अतिशय योग्य होतात.

4. शिक्षण विस्तार अधिकारी जेव्हा स्वतः हातात पुस्तक घेऊन अध्यापन करतात. हे पाहून शिक्षकांना त्या अधिकाऱ्याबद्दल विशिष्ट आदर निर्माण होताना दिसून येतो.

5. शिक्षण विस्तार अधिकारी त्यांच्या अनुभवातून हुशार व बुद्धिमान आहेत. त्यांच्या ज्ञानाचा उपयोग जिल्हा परिषद शाळांचा दर्जा सुधारण्यासाठी नक्कीच होतो.

6. अधिकाऱ्यांकडून शिक्षकांना अध्यापनात मार्गदर्शन झाल्याने शिक्षकांच्या कामकाजाला आणखीन उभारी येते.

7. या नवोपक्रमामुळे विद्यार्थी, पालक, शिक्षक,अधिकारी, पदाधिकारी, ग्रामस्थ यांच्यामध्ये सहसंबंध वाढीस लागून सर्व घटक सक्रिय झाल्याचे दिसून येते.

8. आमचा अभ्यास घ्या. आमचे इंग्रजी वाचन घ्या. हे छोटेशे विद्यार्थी आपल्या पालकांना म्हणत आहे. आम्ही आमच्या सरांच्या मोबाईल स्टेटसला दिसणार आहोत. चांगले इंग्रजी वाचन यायला पाहिजे. यासाठी सतत प्रयत्न करताना दिसून येतात.

9. एखादा विद्यार्थी इंग्रजी वाचण्यात मागे असेल, तर पालक शिक्षकांना भेटून आमच्याही पाल्याला इंग्रजी वाचन शिकवा. त्याच्याकडेही लक्ष द्या. असे म्हणत आहेत.

10. आपल्या पाल्याच्या शिक्षणाबाबत पालक जागृत होताना दिसत आहेत.

11. जिल्हा परिषद शाळेत उत्तम इंग्रजी विषय शिकवला जातो. हा संदेश सर्वत्र जात आहेत. त्यामुळे आपल्या पाल्याला आपल्या गावातील शाळेत उत्तम शिक्षण दिले जाते, ही पालकांची भावना तयार होते.

12. गावातील संपूर्ण नागरिकांचा जिल्हा परिषद शाळेतील शिक्षक बंधू भगिनींकडे पाहण्याचा दृष्टिकोन अतिशय सकारात्मक तयार होतो.

13. जिल्हा परिषद शाळेतील शिक्षकांना इंग्रजी वाचन विद्यार्थ्यांना शिकवणे बाबत प्रेरणा मिळाली.

14. इंग्रजी वाचन शिकण्यासाठी विद्यार्थी स्वतःहून पुढे यायला लागले. आपणही उत्तम इंग्रजी वाचू शकतो. हा आत्मविश्वास विद्यार्थ्यांमध्ये निर्माण झाला. त्यामुळे विद्यार्थ्यांच्या व्यक्तिमत्व विकास साधण्यासाठी हा नवोपक्रम अतिशय उपयुक्त आहे.

15. अभ्यासात मागे असल्यामुळे काही विद्यार्थी शाळेत यायला कंटाळा करतात. परंतु आपणही इंग्रजी वाचतो. आपला इंग्रजी वाचनाचा व्हिडिओ काढून सर टेटस ला ठेवतात त्यामुळे विद्यार्थी आनंदित आहेत, तात्पर्य शाळेची उपस्थिती वाढली.

16. विद्यार्थी आनंदाने शाळेत येऊ लागल्याने पालकही आनंदात आहेत.

17. जिल्हा परिषद शाळेत उत्तमरीत्या शैक्षणिक कामकाज सुरू आहे. हे संपूर्ण गावात समजल्यामुळे शिक्षकांची, विद्यार्थ्यांची, पालकांची प्रतिष्ठा वाढलेली आहे.

18. घराघरात,शाळाशाळात, गावागावात ' संजीवन इंग्रजी वाचन नवोपक्रमाची' चर्चा सुरू झाल्याने संपूर्ण शिक्षण विभागाची प्रतिष्ठा वाढायला सुरुवात झाली आहे.

19. या नवोपक्रमामुळे शिक्षकांना,पालकांना अनेकांकडून कौतुकाचे मेसेज येऊ लागल्यामुळे, सर्वांना भरपूर ऊर्जा व प्रेरणा मिळाली .

20. संजीवन इंग्रजी वाचन नवोपक्रमामुळे विद्यार्थी व शिक्षकांना एक प्रकारची इंग्रजी वाचनाबाबत दिशा मिळाली.

21. एखाद्या दिवशी जरी शिक्षकांनी इंग्रजी वाचन घेतले नाही, तर विद्यार्थी आमचे इंग्रजी वाचन घ्या.अशी आठवण शिक्षकांना देऊ लागले.

22. बऱ्याच ग्रामस्थांना वाटत होते की, आपल्या जिल्हा परिषद शाळांमध्ये इंग्रजी शिकवले जात नाही. हा त्यांचा गैरसमज दूर झाला.

23. ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांचा इंग्रजी विषयाचा पाया पक्का झाल्याचे दिसून येते.

24. एका शिक्षकाचा उपक्रम पाहून अनेक शिक्षक प्रेरित होताना दिसून आले.

25. जिल्हा परिषद शाळांमध्ये जाणीवपूर्वक दर्जेदार शिक्षण मिळण्यास प्रोत्साहन मिळाले.

26. लहान- लहान विद्यार्थ्यांचे व त्यांच्या पालकांचे गावात कौतुक व्हायला लागल्यामुळे पालकांना खूप अभिमान वाटू लागला.

27. आपल्याला इंग्रजी वाचन करता येते. या जाणिवेतून विद्यार्थ्यांना सेमी इंग्रजीचा अभ्यास करणे सोपे वाटू लागले.

28. आपला पाल्य इंग्रजी कसा वाचतो? हे पालकांना शिक्षकांच्या मोबाईल स्टेटस मुळे घरबसल्या समजू लागले.


29. विद्यार्थी- शिक्षक- पालक- ग्रामस्थ- अधिकारी यांच्यातील दरी कमी होऊन शैक्षणिक विचारण्याची देवाण-घेवाण सुरू झाल्याचे दिसून येते .

30. शिक्षक शिक्षकांमध्ये शैक्षणिक विचारांची देवाण-घेवाण सुरू झाली.

31. यापूर्वी फक्त ठराविक विद्यार्थीच इंग्रजी वाचनात पुढे यायची. परंतु आता विद्यार्थ्यांमध्ये इंग्रजी विषयाची आवड निर्माण होत आहे. आपल्या शिक्षकांच्या मोबाईल टेटस वर आपण दिसावं म्हणून विद्यार्थी स्वतः प्रयत्न करत आहेत. अगदी शाळेच्या मधल्या सुट्टीत देखील विद्यार्थी इंग्रजी वाचनाचा सराव करताना दिसतात.

32.'संजीवन इंग्रजी वाचन ' उपक्रमामुळे जिल्हा परिषद शाळेत शिकणारा विद्यार्थी कुठे कमी पडणार नाही. असे माझे ठाम मत आहे.

33. संजीवन इंग्रजी वाचन नवोपक्रमामुळे शिक्षकांनी केलेले शैक्षणिक कामकाज समाजाला दाखवण्यासाठी एक उत्तम माध्यम असा नवोपक्रम आहे.




'संजीवन इंग्रजी वाचन नवोपक्रम ' एक उत्तम माध्यम आहे.1 ते 33 मुद्द्यांचा विचार करता 'संजीवन इंग्रजी वाचन नवोपक्रमात' निश्चित नाविन्यता आहे. याचा नवोपक्रम कर्त्यास आत्मविश्वास आहे.

## संजीवन इंग्रजी वाचन प्रकल्प

तालुका-राहाता जिल्हा-अहमदनगर

| केंद्राचे नाव | केंद्रातीलएकूण शिक्षक | प्रकल्पातसहभागी शिक्षक संख्या | सहभागीशिक्षकांचा एकूण पट | इंग्रजीवाचन करणारे विद्यार्थी |
|---|---|---|---|---|
| साकुरी | 59 | 16 | 316 | 179 |
| लक्ष्मीवाडी | 72 | 17 | 393 | 221 |
| वाकडी | 37 | 15 | 284 | 191 |
| सा.विहीर | 29 | 26 | 494 | 300 |
| गणेशनगर | 68 | 22 | 652 | 428 |
| रांजणखोल | 44 | 26 | 525 | 295 |
| पुणतांबा | 40 | 20 | 631 | 228 |
| कोल्हार | 33 | 20 | 503 | 284 |
| बाभळेश्वर | 53 | 21 | 526 | 352 |
| दाढ | 32 | 21 | 418 | 261 |
| लोणी | 57 | 20 | 504 | 285 |
| अस्तगांव | 48 | 20 | 575 | 357 |
| **एकूण** | **572** | **244** | **5821** | **3381** |

वरील दिलेल्या माहितीनुसार 149 शाळांतील 244 शिक्षकांचे 5821 पैकी3381(58.08%) विद्यार्थी इंग्रजी वाचन करीत असल्याबाबतचे अहवाल दिलेले आहेत, तथापि 337 शिक्षकांचे 8459 पैकी 4942 (58.42%) विद्यार्थी असखालीतपणे इंग्रजी पुस्तकाचे वाचन करतात. मा. मुख्य कार्यकारी अधिकारी जिल्हा परिषद अहमदनगर श्री. आशिष येरेकर साहेब (IAS) यांनी दाखल घेऊन खास अभिनंदन पत्र दिले आहे. 337 शिक्षकांनी नवोपक्रमात सहभाग घेतल्याची बातमी प्रकशित झालेली आहे. जीवन शिक्षण मासिकात **"संजीवन इंग्रजी वाचन प्रकल्प"** लेख प्रकाशित झालेला आहे. **"संजीवन इंग्रजी वाचन प्रकल्प"**नावाने YouTube चॅनेल सुरु करून विद्यार्थी

वाचनाचे 62 व्हिदिओ अपलोड केले आहे. **मराठी शाळेतील मुले देखील वाचू लागली खडा खडा इंग्रजी** या मथाळ्याचे बातमी दिव्य मराठी वृत्त पत्रात 13/10/2022 रोजी प्रकाशित झाली. या बातमीची दखल घेऊन श्री. भास्कर पाटील शिक्षणाधिकारी (प्राथमिक) जिल्हा परिषद अहमदनगर यांनी समक्ष पाहणी करून खूप समाधान व्यक्त केले.

# 8.समारोप

अहमदनगर जिल्ह्यातील राहाता तालुक्यातील सर्व शाळातील विद्यार्थी, शिक्षक,पालक,ग्रामस्थ,शाळा व्यवस्थापन समिती अध्यक्ष, सदस्य, शिक्षण प्रेमी, अधिकारी, पदाधिकारी या सर्वांनी हा उपक्रम साकारण्याच्या निमित्ताने मला प्रेरणा दिली व सहकार्य केले. त्यांच्याप्रती ऋण व्यक्त करणे हे क्रमप्राप्त आहे. या सर्वांना मी 'संजीवन इंग्रजी वाचन नवोपक्रमाच्या' वतीने खूप धन्यवाद देतो. नेहमीच संजीवन इंग्रजी वाचन या नवोपक्रमाचे कौतुक करणारे वरील सर्व या नवोपक्रमाच्या यशाचे खरे मानकरी आहेत. 'संजीवन इंग्रजी वाचन' नवोपक्रमाच्या प्रसिद्धीसाठी वृत्तपत्राचे संपादक व प्रतिनिधी यांचा मी खास आभारी आहे. त्यांच्या वृत्तपत्राचा व त्यांच्या नावाचा उल्लेख खालील प्रमाणे

1. 'क्षितिज समाचार' , संपादक श्री गोरख दादा गवारे पाटील यांनी या उपक्रमाबाबत सहा बातम्या देऊन या उपक्रमाला उत्कृष्ट प्रसिद्धी दिली. त्याबद्दल त्यांचे आभार मानण्यात येत आहेत.

2. ' कॉमन न्यूज ' या वृत्तपत्राने ' संजीवन इंग्रजी वाचन' नवोपक्रमावर **दिवे यांचा आगळा वेगळा संजीवन इंग्रजी वाचन प्रकल्प. राहाता तालुक्यातील जिल्हा परिषद शाळा इंग्रजीमध्ये प्रगतीपथावर** अशी बातमी देऊन या नवोपक्रमाचा प्रचार व प्रसार केला त्याबद्दल संपादक श्री अल्ताफ शेख व प्रेरणा स्रोत आदरणीय सलीम खान पठाण सर यांचे खूप धन्यवाद !

3. सायंदैनिक ' साईसंध्या ' संपादक श्री.गजानन गारोळे ,मार्गदर्शक शौकतभाई शेख यांचे आभार व्यक्त करण्यात येत आहे.

4.' न्यूज ई समता ' श्री.शौकतभाई शेख यांचे आभार.

5. ' दिव्य मराठी ' वृत्तपत्र,अहमदनगर सिटी आवृत्ती प्रतिनिधी कुदाळ सर यांनी **मराठी शाळेतील मुले देखील खडाखडा वाचू लागले इंग्रजी** बातमी प्रकाशित केल्यामुळे त्यांचे खूप आभार मानण्यात येत आहेत.

6. ' जलभूमी ' वृत्तपत्र संपादक श्री शंकरराव मरकड,श्री.शिवम जाधव ,मार्गदर्शक श्री.शौकतभाई शेख **संजीवन इंग्रजी वाचन प्रकल्प विस्तार अधिकारी दिवे यांचा दिशादर्शक प्रयोग** याबद्दल श्री.रज्जाक शेख यांचे आभार मानण्यात येत आहे.

7.शिर्डी एक्स्प्रेस लाइव्ह श्री.शौकतभाई शेख यांचे आभार

8. दैनिक स्वाभिमानी,छावा सोलापूर **विस्तार अधिकारी दिवे यांचा दिशादर्शक प्रयोग** ही बातमी प्रकाशित केल्याबद्दल हार्दिक आभार.

9. दैनिक सार्वमत **वाचन उपक्रमाने विद्यार्थ्यांना इंग्रजीची लागली गोडी, शिक्षण विस्तार अधिकारी संजीवन दिवे यांचा उपक्रम** प्रतिनिधी श्री जेजुरकर सर यांचे हार्दिक आभार

10. दैनिक सार्वमत, शब्दगंध पुरवणीमध्ये संपूर्ण लेख छापून **संजीवन इंग्रजी वाचन प्रकल्प -एक यशस्वी प्रयोग** प्रतिनिधी जेजुरकर सर यांचे हार्दिक आभार.

11. दैनिक हिंदुस्थान संपादक श्री देवेंद्र भुजबळ साहेब, निर्मिती श्रीम. अलका भुजबळ यांनी संजीवन इंग्रजी वाचन प्रकल्पावर लेख देऊन प्रसिद्धी दिली, तसेच न्यूज स्टोरीज टुडे - राष्ट्रीय शिक्षण दिनी संजीवन इंग्रजी वाचन प्रकल्पावरील लेख विद्यार्थ्यांच्या व्हिडिओसह प्रकाशित केला. त्याबद्दल त्यांचे जाहीर आभार.माध्यम वृत्तसेवा यांनी लेखास प्रसिद्धी दिल्याने आभार व्यक्त करण्यात येत आहे.

12. ' नायक ' वृत्तपत्राने 'संजीवन इंग्रजी वाचन नवोपक्रमास ' प्रसिद्धी दिल्याबद्दल त्यांचे आभार व्यक्त करण्यात येत आहे.

13. S9 news चे प्रतिनिधी श्री इनुस इनामदार यांनी 13 मिनिटांची टीव्ही बातमी तयार करून तिला प्रसिद्ध दिली त्याबद्दल त्यांचे खास अभिनंदन.

14. उत्कृष्ट उपक्रमाची उत्कृष्ट प्रसिद्धी दिल्यामुळे समाजामध्ये संजीवन इंग्रजी वाचन हा नवोपक्रम घराघरांमध्ये पोहोचला. प्रत्येक शाळेतील शिक्षक विद्यार्थी व पालक मोठ्या प्रमाणात सहभागी झाले.

15. संजीवन इंग्रजी वाचन नवोपक्रमाच्या फलनिष्पत्तीची व प्रसिद्धीची दखल घेऊन अहमदनगर जिल्हा शिक्षण अधिकारी श्री भास्कर पाटील साहेब यांनी समक्ष जिल्हा परिषद प्राथमिक शाळा कोल्हार बुद्रुक शाळेची पाहणी केली. विद्यार्थ्यांना इंग्रजी वाचन करण्यास सांगितले. विद्यार्थ्यांचे इंग्रजी वाचन पाहून समाधान व्यक्त केले. सदरचा नवोपक्रमाचे माझ्याकडून समक्ष प्रात्यक्षिक करून घेऊन एकदम अति उत्कृष्ट उपक्रम आहे ,अशी प्रतिक्रिया दिली. त्याचप्रमाणे माननीय मुख्य कार्यकारी अधिकारी श्री.आशिष येरेकर साहेब जिल्हा परिषद अहमदनगर यांनी या उपक्रमाची दखल घेऊन उपक्रम कर्त्यास अभिनंदन पत्र दिलेले आहे. या सर्वांचा मी ऋणी आहे. धन्यवाद...

संजीवन दिवे.

शिक्षण विस्तार अधिकारी, बीट- शिर्डी,
अतिरिक्त बीट- लोणी,बीट - पुणतांबा.
पंचायत समिती राहता. जिल्हा- अहमदनगर.

# 8.संदर्भ ग्रंथ

1. राष्ट्रीय शैक्षणिक धोरण 2020

2. बाल मानसशास्र

3.अध्ययन-अध्यापन पद्धती.